<u>वादीतर्फे उलटतपास श्री.व्ही.ए.सोनकांबळे यांच्यामार्फत सुरु.</u>

**१८.** मी बारावी नापास आहे. हे खरे की, मी याकामी कैफीयत दिली आहे. भूसंपादन अधिनियम १८९४ कलम ५४ मला माहिती नाही. या कलमाबद्दलचा उल्लेख कैफीयतीमध्ये माझ्या वकीलसाहेबांनी लिहीला यास माझे सांगणे त्यातील मजकूर मी सांगितलेला आहे. कलमाबद्दल मला काही सांगता येत नाही.

**१९.** माझ्या वडीलांना वडीलोपार्जित ७ एकर २० गुंठे जमीन होती. हे खरे की, वादीला माझ्या वडीलांनी ५ एकर १९ गुंठे जमीन मौजे उजना येथील जमीन खरेदीपत्राने दिली. हे खरे की, त्याबद्दल मला माहिती आहे. वादग्रस्त जमीन माझ्या नावे माझ्या चुलत्यांकडून खरेदीपत्राने घेतली. चुलत्यांचे नाव राम व लक्ष्मण राठोड असे आहे. मी पुन्हा सांगतो की, ती जमीन माझ्या आईने घेतली . त्यावेळी मी नववी किंवा दहावीला होतो. हे खरे की, त्यावेळी मी अज्ञान होतो. वादग्रस्त जमीन दि.२२/०५/१९९६ रोजी उत्तम राठोड यांना विकली हे खरे नाही. या खरेदीपत्रानुसार रु.१३,०००/ मी घेतले होते हे खरे आहे. हे खरे की, त्यावेळी माझे वय २० वर्षे होते. हे खरे की, आज अखेर हे खरेदीपत्र शाबुत आहे. हे खरे की, हे खरेदीपत्र आजअखेर रद्द झालेले नाही. माझ्या वडीलांनी जी ५ एकर १९ गुंठे जी जमीन वादीला विकली होती त्यातीलच ४४ गुंठे जमीन माझ्या नावे होती हे खरे आहे. हे खरे नाही की, ती ४४ गुंठे जमीन उत्तम सोपान राठोड याला विकली. दशरथने मी व उत्तम यांच्याविरुध्द या ४४ गुंठे जमीनीसाठी रे.दि.मु.क्रं.३६१/१९९६ हा दावा दाखल केला हे खरे नाही. आता मला रे.दि.मु.क्रं.३६१/१९९६ मधील हुकूमनाम्याची प्रत दाखविली. त्यामध्ये माझे व उत्तमचे नाव आहे हे खरे आहे. त्यास **निशाणी १२५** देण्यात येते. त्या दाव्यातील माझे वकील श्री.व्ही.एस.शेळके हे होते. त्यामध्ये तडजोड झाली. त्या दाव्यात तडजोड झाली. त्या दाव्याशी माझा काहीही संबंध नाही. त्या तडजोडीप्रमाणे दशरथने गट क्रं.१५५ मधील ४१ आर जमीन उत्तम सोपान

राठोड याला दिल्याचे मला माहिती नाही. गट क्रं.१५३ मधील ४४ आर जमीन प्र.वादी क्रं. १,२ म्हणजे मी व उत्तम राठोड यांनी वादी दशरथ परतवाघ याच्या हक्कात सोडून दिली हे म्हणणे खरे नाही. त्या तडजोडीचा हुकूमनामा झाला हे खरे नाही. त्या तडजोडीतील ४४ आर जमीन हिच या दाव्यातील वादमिळकत आहे हे खरे आहे. कोर्ट डिक्री खोटी आहे असे माझे म्हणणे खोटे आहे हे खरे आहे. आम्ही खरेदीपत्राने  उत्तमला विकलेल्या जमीनीचा फेरफार महसूल दफ्तरी उजर करुन होऊ दिला नाही हे खरे आहे. हे खरे की माझ्या आईने खरेदी घेतलेल्या या जमीनीच्या या खरेदीपत्राच्या तारखेपासून आजअखेर दावामिळकतीचा सातबारा माझ्याच नावे आहे. हे खरे नाही की, सातबारा सदरी असलेल्या माझ्या नावाचा गैरफायदा घेऊन मी शासनास ही जमीन संपादीत करु दिली व तिचा मावेजा उचलला. हे खरे नाही की, माझे शपथपत्र खोटे आहे व मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

**दिनांक २८/११/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**